


आठवण
तुझी आठवण आली ना की मला माझाच राग येतो,
संपले ना सर्व तुझ्याकडून मग असा का त्रास देतोस?
नको त्या खोट्या शपथा, नको त्या सुखद आठवणी
आठवून सर्व काय करू? मग डोळ्यांत येते पाणी
आठवणींनी पाणावलेल्या डोळ्यांत, तुला इतरांपासून लपवू कसे?
भरभरून वाहणाऱ्या अश्रूंना थोपवून, खोटे हासू आणायचे तरी कसे?
ते अश्रू लपवण्याच्या प्रयत्नांत, मग मी तुलाच दोष देत राहते
आणि या खोटया प्रयत्नांत, तुला आणखीनच आठवत राहते!
–संचिता–
keep smiling
I wont leave you


अपराधी
तुला दुखावण्याचा माझा कधीही हेतू नव्हता
जिवापाड जपण्याचाच माझा नेहमी प्रयत्न होता.
नशीबवान आहे मी, तू भरभरून प्रेम दिलेस मला
तुझ्याकडून फुले घेऊन मात्र, मी कायम काटेच दिले तुला
तुझे हृदय तोडताना माझ्याही काळजावर वार झाले,
पण जन्मदात्यांना दुखावणे मला शक्य नाही झाले.
काहीही तक्रार न करता, तु हे सत्य स्वीकारलेस आहे,
कधीही माफ करू नकोस मला, मी तुझा अपराधी आहे.
तुझे हृदय माझ्यासाठी क्षणनूक्षण असेल रडत,
आजही तुझी नजर सर्वत्र मलाच असेल शोधत.
माझ्या आठवणींत तुझ्या रात्री घालवू नकोस व्यर्थ,
परस्परांची आस धरण्यात आता उरला नाही अर्थ.
माझ्यासाठी तू जराही बाळगू नकोस ग खंत,
आपल्या प्रेमास बंधनकारक ठरली ही समाजाची भिंत!
-संचिता-


अपूरी कविता
तुझं माझ्या आयुष्यात येणं, मला अगदीच अनपेक्षित होतं
पण मला हवंहवंस वाटणारं, माझ्या आयुष्यातील महत्वाचं वळण होतं
डोळयांसमोर असतो सदा तुझाच चेहरा, तुझ्याच विचारांत मी नेहमी मग्न
तुझ्यात इतकी गुंतले मी बघ ना, रात्रीही पडते तुझेच स्वप्न
तुझं मला हो म्हणंण म्हणजे, माझ्या आयुष्यातील सोनेरी क्षण
ज्या एका क्षणाभोवती घातलीय, मी माझ्या भविष्याची गुंफण
त्या वळणापासून ते थेट माझ्या मृत्यूपर्यंत, हवीय फक्त तुझीच साथ
चालशील ना रे सोबत माझ्या घेऊन हातामध्ये हात?
तुझ्याशिवाय आयुष्य ही कल्पनाही करवत नाही मला
तेच तुला सांगण्यासाठी, मी हा कवितेचा प्रयत्न केला
भावनांना शब्दांत बांधण्याची पूर्ण कोशिश केली,
पण भावनाच इतक्या मोठ्या की ही कविताच अपूरी पडली!
—संचिता—



## असा असावा तो...

नाही भेटले मी दिवसभर तर
त्याने खूप बेचैन व्हावं
संध्याकाळी ऑफिसबाहेर भेटून
मला अगदी सरप्राईज द्यावं
भेटण्यासाठी ठरलेल्या ठिकाणी
त्यानं नेहमी माझ्या आधी यावं
आणि मी उशिरा आले म्हणून
मग लटके लटके रागवावं
फिरताना जर मी नजरेआड झाले
तर त्यानं कावरंबावरं व्हावं
आणि मी दिसल्यानंतर मात्र
अश्रू लपवत मला प्रेमानं ओरडावं
माझं काही चुकलं तर
त्यानं कधीही न रागवावं
अबोला धरून मला न रडवता
काय चुकलं ते समजवावं
ज्याची कल्पनाही नाही केली इतकं
भरभरून प्रेम देणारी ती व्यक्ती असावी
माझी आठवण आली त्याला की
त्यानंही माझ्यासाठी एक कविता लिहावी!


—संचिता—



## तुला आठवता आठवता....

कविता लिहावी म्हटलं
म्हणून निळं पेन हाती घेतले
आणि झटकन डोळ्यांसमोर
तुझेच चित्र तरळले
तो शामलरंग तुझा
ते डोळे तुझे पाणीदार
तरतरीत नाक ते तुझे
चाल तुझी तडफदार
हसताना एकाच गालावर
पडायची सुंदर खळी एकदम
कितीही रागावलेला असलास तरीही
माझ्या बालिशपणावर हसायचास खुदकन
तुला आठवता आठवता निळाईने
तुझे अगदी छान चित्र रेखाटले
फक्त नजर लागू नये तुला म्हणून
काजळाचा ठिपका द्यायला विसरले
काय होतं तुझ्यात इतकं
की तुला अजूनही नाही विसरले
कविता लिहीता लिहीता आता
मी तर चित्रकारही झाले!

—संचिता—


पेच
अचानक तो तिच्या आयुष्यात आला
तिच्या रूक्ष जीवनात जणू अंकुरच फुटला
होत असे बेभान ती पाहण्यासाठी त्याला
त्याचा एकेक शब्द तिने हृदयात साठवलेला

त्याला मात्र नव्हती याची कल्पना जराही
तो सदा आपल्या कामातच गुंग राही
ती मात्र त्याला नेहमीच चोरून पाही
सवंगडीही तिचे देतील याची ग्वाही

याला काय म्हणावे हेच कळत नव्हते तिला
काही असले तरी तिचा जीव त्याच्यात गुंतला
अगदी नकळत हा पेचही तिच्या मनाने सोडवला
दुसरे तिसरे काही नाही वेडे प्रेमच म्हणतात याला!
--संचिता--



मलाही वाटलं...
आज पाहिलं त्याला, तिची समजूत काढताना
तिच्या रागावलेल्या गालांवर, नंतर कळी खुलताना!


दुसरी एक ती,मॉलमध्ये तासंतास भटकत होती
त्याच्यासाठी काय घ्यावे, हेच तिची नजर शोधत होती


एका ठिकाणी फिरत होती, ती दोघं हातांत हात घालून
कुणाचेही त्यांच्यांकडे लक्ष नाही, अशा वेड्या भ्रमात राहून

मलाही क्षणभर वाटलं,कुणीतरी असं माझंही असावं
त्यानंही मला,अगदी तळहातावरील फोडाप्रमाणं जपावं

मलाही वाटलं,
कुणीतरी माझ्यावरही,इतकं जीवापाड प्रेम करणारा असावा
की माझ्यासाठी मग,स्वर्गसुध्दा अगदी दोन बोटांवर उरावा!

—संचिता—


अपेक्षा
तो तिच्यावर करायचा
तिच्याशी बोलण्यासाठी निमित्तच शोधायचा
ती मात्र होती या गोष्टीपासून अजाण
त्याला मात्र नव्हते इतर कशाचेच भान
ती त्याच्याशी बोलतही नसे
तरीही त्याला ती आपलीच भासे
तो विचारात नेहमी तिच्याच असे
मित्र मात्र उडवायचे त्याचे हसे
अचूक वेळ पाहून सांगायचे त्याने ठरवले
पण विधात्याने ठरवले होते काहीतरी वेगळे
ती तिथून कायमची जाणार हे त्याला कळले
शेवटी तिला जे सांगायचे ते राहूनच गेले
तो स्वत:लाच दोष देत राहीला
संपूर्ण रात्र आसवे ढाळत बसला
जाण्यापूर्वी तिला हे सांगायचेच केला त्याने निर्धार
अपेक्षा ठेवून मनी कि मिळेल त्याला होकार!
—संचिता—


परतीचा प्रवास...
आज या शेवटच्या क्षणांत,
मला खरोखरचं तुझी खूप गरज भासतेय
तू माझ्यासाठी परतावंस असं मनापासून वाटतंय
आठवतं मी म्हटलं होतं,
हे जग सोडून जाताना मला फक्त तुला पहायचंय
ती वेळ आलीय आता या पापण्यांनाही मिटायचंय
मी रोजचेच मोजले हे अंतर, तुला मात्र मी आठवलेही नाही रे नंतर
तू आहेस सुखात म्हणून मी सुखात आहे
पण माझ्या शेवटच्या क्षणांत तरी माझा तुझ्यावर हक्क आहे.
सर्व शरीर कणकणतंय, रोमारोमातून तुझंच नाव निघतंय
खरंच रे नाही जराही शिल्लक राहीले त्राण
तुला डोळेभरून पाहील्यावरंच, सोडायचायं मला हा प्राण
जीव गुंतला रे तुझ्यात
तुला त्याला आता मुक्त करायचंय
आणखी वेळ नको घालवू, मला परतीच्या प्रवासाला निघायचंय.
—संचिता—


तुझ्याविना

खूप बोलायचंय तुझ्याशी तू परत आल्यावर
पटवून दयायचंय तुला किती उणीव भासली तू गेल्यावर


लवकर ये परत तू, आता कुठंही जाऊ देणार नाही तुला
इतकी आठवणं आली तुझी, तू एकदा तरी आठवलंस का मला

लवकर ये परत तू, तुला डोळे भरून पहायचंय
लटके लटके रागावून स्वत:लाच मनवून घ्यायचंय

तुझ्या विरहाचं शल्य क्षणाक्षणाला बोचतयं
शिरून मिठीत तुझ्या  खूप खूप रडायचंय

हे दुराव्यातील दिवस मला खूपच खायला ऊठले
तुझ्याविना मी किती अधूरी, माझं मला कळून चुकले.

----संचिता----


पुढल्या जन्मी...

तुझ्यावर प्रेम करताना
कसलाच विचार केला नव्हता
कारण वाटायचं मला
साक्षात परमेश्वरच माझ्या पाठीशी होता


कधीच विचार केला नाही
की पुढे काय होईल
प्रेमाच्या फुलांची परडी
नंतर काटयांची जाळी होईल

खरंच तुला काहीचं नाही का वाटलं
मला सोडून जाताना
स्वप्नातही वाटलं नव्हतं
की तू करशील अशी प्रतारणा

नाही दोष देत मी तुला,
की वाटत नाही दुखः तू सोडून गेल्याचे
कित्येक रात्री रडून काढल्या,
दुखः वाटते ते फक्त जीव गुंतल्याचे

मृत्यूतही तुझाच विचार
शेवटी मनात येऊन जाईल
पुढल्या जन्मी तरी तू
माझा व्हावास हेच वचन घेऊन
देवाकडून पुढला जन्म घेईन

------संचिता-----


अभिमान

तुझं ते निरागस बोलणं,
मला खूप आवडतं
चारचौघांतही तुझं वेगळेपण,
अगदी आपसुखच जाणवतं

तुझ्या डोळयांत दिसून येतो,
माझ्यावरचा अतोनात विश्वास
खळखळून हसणं तुझं
खरंच वाटतं झकास

तुझा तो मिश्कीलपणा,
आणि ते खोडया करणं
जराजरी रागावलो मी तरी,
चटकन डोळयांत पाणी काढणं

माझा प्रत्येक शब्द,
तू किती सहजपणे जपतेस
सांग वरं ही कला
कोणत्या शाळेत शिकतेस?

तुलाही फुलाप्रमाणे जपण्याचा,
मी आटोकाट प्रयत्न करतोय
अभिमान वाटतो मला माझा
की मी तुझ्यावर प्रेम करतोय.

----संचिता----



## व्यथा

कुठूनतरी येतो मनात
नकळत तुझा विचार
मग स्वत:लाच समजू
लागते मी अगदीच लाचार

तुझ्याच भावविश्वात मी
अगदी गेले होते रंगून
आता जाणवले मला सुध्दा
चूक केली तुला देव मानून

आलासच का अचानक
एकाकी आयुष्यात माझ्या
दिलेस कायमचे दुख: असे
ज्याच्या जखमा आहेत अजून ताज्या

आठवतात ते सुखदक्षण
तुझी ती गोडमधुर वाणी
पण बोचतात माला ते काटयांसारखे
आणि डोळयांत येते चटकन पाणी

सोबत जर दयायचीच नव्हती
तर शपथा घेतल्यासच का?
अन इतकं सर्व सोसूनही
मी अजून जिवंत का??

---संचिता---



# नेटप्रेम

CHATTING ला आलीस की बोलत राहतेस बरेच काही
आणी फोनवर मात्र तुला काय बोलायचे ते सुचत नाही

एकमेकांची सर्व माहिती कळली ना आता
इतके दिवस CHAT करतोय,काहीतरी HINT दे ना आता


कळत नाही तुला DIRECT विचारू की नाही?
हे CHATTING प्रकरण पुढे जाईल की नाही?

मी ना आता नवा CHAT-ID बनवणार आहे
तुझ्याशी मात्र जुन्याच ID वरूनच CHAT करणार आहे

नवीन ID वरून तुला दुसऱ्या नावाने भेटेन
कुणाच्या प्रेमात आहेस का हे मात्र नक्की विचारेन




त्यातून काही जर कळल्या मला +VE खुणा
मागणी घालेन तुला WITH MY मराठी बाणा



अपेक्षेमाणे रूप घेईल का हे आपले CHATTING
तुझ्या सोबत होईल का माझ्या आयुष्याची SETTING ?

—संचिता—

heart...